**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट                    दिनांक - ०८/०९/२०२२

**दि.०७/०९/२०२२ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | वाकड पोस्टे ७५९/२०२२ भादवि कलम ३०८,३२४,३२३,५०४,५०६,३४ भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), म.पो.का कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६/०९/२०२२ रोजी २१.०० वा.ते २१.३० वा.चे दरम्यान जिवन चौक काळेवाडी पुणे येथील सार्वजनिक रस्त्यावर |
| गुन्हा दाखल | :- | दि.०७/०९/२०२२ रोजी ०८.३४ वा. |
| फिर्यादी | :- | अश्विन राहुल सिंग वय-१७ वर्षे, रा.नडेनगर, जयहिंद विहार कॉलनी, काळेवाडी पुणे |
| आरोपी | :- | १) मन्या ऊर्फ प्रतिक संजय घोडके वय-२२ वर्ष रा.काळेवाडी पुणे घोडके व त्याचेबरोबर त्याचे तीन अनोळखी मित्र. पुर्ण नाव पत्ते माहीत नाहीत. **आरोपी क्रं १ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्याचे मित्र कुणाल चौधरी, तेजस वराडे व अनुज गोड गप्पा मारत जिवन चौक काळेवाडी येथुन पायी चालत जात असताना सदर ठिकाणी काही मुले दारु पिउन मोठमोठ्याने शिव्या देत होती म्हणुन फिर्यादी याने त्यांच्याकडे पाहील्याने त्याचा राग येवुन आरोपी यांनी फिर्यादीस हाताने मारहाण करुन रत्यावर खाली पाडले व आरोपी क्रं १ याने फिर्यादीच्या पॅन्टच्या पाठीमागील बाजुतुन कोयता बाहेर काढुन फिर्यादीचे डोक्याच्या मागील भागावर वार करुन दुखापत केली व "मी मन्या घोडके पिंपरी चिंचवडचा भाई काळेवाडी मधे राहायचे असेल तर ईज्जतीत राहायचे नाहीतर मी एक एकाला जिवंत सोडणार नाही असे म्हणुन त्याचे हातातील लोखंडी कोयता हवेत फिरवुन लोकांमध्ये दहशत माजविल्याने तेथे जमा झालेले लोक भितीने सैरा वैरा पळु लागले तसेच भांडण सोडविण्याकरीता फिर्यादी यांचे मित्र मध्यस्थी आले असता मन्या घोडके याचे मित्रांनी फिर्यादीच्या तीन मित्रांना हाताने मारहाण केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि चव्हाण ९५४५४८६०२८ |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | वाकड पोस्टे ७६१/२०२२ भा.द.वि. कलम ३०८,३२४,३२३,५०४,५०६ भादवि सह भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५),सह मपोका कलम ३७(१)(३)/१३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दिनांक-०६/०९/२०२२ रोजी २१.१५ ते २१.३० वा.चे दरम्यान सुयोग कॉलनी, नढेनगर,पाटील हॉस्पीटलजवळ,काळेवाडी |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक -०७/०९/२०२२ रोजी २०.२३ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १)अभि निंबाळकर २)अश्विन सिंग, ३)अनुज गोळे व ४)गौरव इंगवले **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा भाऊ प्रतिक व अथर्व असे याठीकाणी गप्पा मारीत उभे असताना अचानक फिर्यादी यांचे ओळखीचे नमुद आरोपी मजकुर यांनी फिर्यादी यांचे दिशेने दगड फेकण्यास सुरवात केली |

म्हणुन फिर्यादी यांचा भाऊ प्रतिक व अथर्व याने त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला परंतु त्याचा त्यांना राग आल्याने त्यांनी फिर्यादीचे भाऊ प्रतिक व अथर्व यांना लाथा-बुक्क्याने मारहाण केली.फिर्यादी भावांना सोडविण्याकरीता मध्ये गेल्या असता आरोपी क्रं १ याने फिर्यादी यांना शिवीगाळ करुन पॅन्टच्या मागील बाजुतुन कोयता बाहेर काढुन फिर्यादी यांच्या डाव्या हाताचे बोटांवर मारुन दुखापत करुन "मी अभि निंबाळकर काळेवाडी का डॉन हैदर भाई का राईट हॅंड आपल्याशी नीट राहायचे,हैदर भाईच्या पोराशी पंगा घेतला तर एक एकाला सोडणार नाही अशी धमकी देवुन त्याचे हातातील लोखंडी कोयता हवेत फिरवुन दहशत निर्माण केली म्हणुन

| | | |
|---|---|---|
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सचिन चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक ९५४५४८६०२८ |

३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | चाकण (म्हाळुंगे चौकी) १४३२/२०२२ अनु.जा.ज.अ.प्र.का.क.३(१)(आर)(एस),सह नागरी हक्क संरक्षण अधि. १९५५ चे क.७(१)(ड) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ११/६/२०२२ रोजी १६.०० वा.चे सुमा.मौजे महाळुंगे गावचे हददीत, पॉलीरब कंपनी समोर ता.खेड जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक ०७/०९/२०२२ रोजी २०.३६ वेळ वाजता |
| फिर्यादी | :- | कपिलभुषण बाळासाहेब कांबळे वय ३० धंदा, लेबर सप्लायर्स, जात, महार, रा.आळंदी देवाची, बन्सीलालगोडावुन पाठीमागे, माउली बिल्डींगता.खेड जि.पुणे मुळ राहणार केरवाडीता.पालम जि.परभणी |
| आरोपी | :- | विनोद दिवाकर उपाध्याय वय ४७ वर्ष, मुळ रा.गांधीनगर, २३/एच, गोरखनाथ,गोरखपुर, ता.जि.गोरखपुर, राज्य उत्तरप्रदेश, सध्या रा. तळेगाव दाभाडे,फ्लॅट नं. ए-३/३०३, लॅटीसको ऑपरेटीव्ह सोसायट<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादीचे व कामगारांचे यातील आरोपी हा पैसे देत नसल्याने फिर्यादी कामगारांनाघेवुन पोलीस चौकीला त्याचे विरुदध तक्रार देण्यासाठी आले असता यातील आरोपी हा देखिल आला होता, फिर्यादीस आरोपी याने यापुर्वी दिलेली अल्टीस कार घेवुन फिर्यादी आले होते, आरोपी याने फिर्यादीचे ताब्यातील अल्टीस कार थोडा वेळ दे मी मुलाला सोडुन येतो असे म्हणुन गाडी घेवुन गेला, तो थोडे अंतर पुढे गेल्यावर त्याने फिर्यादीस फोन करुन पॉलीरब कंपनीचे समोर बोलाविले त्यावेळी फिर्यादी त्यांच्या तोंड ओळखीच्या मित्राचे मोटार सायकल वर बसुन त्याठिकाणी गेले असता आरोपी याने त्या गाडीची काच फोडली होती, गाडीतच त्याचा ॲपल मोबाईल, ओळखपत्रे, बॅंकेच पासबुक, ए टी एम कंपनीची चावी ठेवलेली होती. व फिर्यादी बरोबर हातापायी करुन गोंधळ घालुन हिंदीमध्ये चामार की अवलाद धेडका है तु, चामार तु मेरे कंपनी मे आणेका नही असे म्हणुन फिर्यादीस जातीवाचक बोलुन असे म्हणुन गाडी लेके जा असे बोलुन चावी फिर्यादीचे अंगावर फेकुन दिली त्यावेळी फिर्यादीने त्याची चावी घेवुन गाडी घेवुन निघाले, फिर्यादी सदरची गाडी कराराप्रमाणे त्याचे कडुन घेवुन गेले असल्याने फिर्यादी पोलीस चौकीला येणे टाळले व सायंकाळी फिर्यादीचे राहते घरी सदरची गाडी घेवुन गेले, त्यानंतर फिर्यादीस समजले की, आरोपी याने फिर्यादीचे विरुध्द तसेच फिर्यादीचा भाउ व इतरदोन अनोळखी लोकांचे विरुदध, आरोपी यांची गाडी, मोबाईल व इतर साहीत्य जबरदस्तीने घेवुन गेल्या बाबत कलम ३९४ व इतर प्रमाणे गुन्हा दाखल झाला असले बाबत माहीती मिळाल्याने फिर्यादी प्रथम सेशनकोर्ट येथे जामिनासाठी अर्ज केला तो अर्ज नामंजुर झाल्याने फिर्यादीने मा.उच्च न्यायालयात जावुन इंटेरीअम जामिन मंजुर झाल्या नंतर आज रोजी तक्रार देण्यासाठी पोलीस चौकीला आले आहे. म्हणुन गुन्हा दाखल |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सहा.पो.आयुक्त कट्टे मॅडम मोनं.९४२३४८८५९७ |

४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | पिंपरी ७५२/२०२२भादवी कलम ३७९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६/०९/२०२२ रोजी १२/३० ते १३/३० वा चे सुमा लोढा बेलमांडो सो बी २३फ्लॅट नं ७०४ गहुंजे ता मावळ जि पुणे ते तनिष्क ज्वेलर्स मोरवाडी पिंपरी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि. ०७/०९/२०२२ रोजी १५/१३ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | **अज्ञात इसम** |
| तपशिल | :- | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे राहते घरुन गहुंजे ता मावळ जि पुणे ते तनिष्क ज्वेलर्स मोरवाडी पिंपरी पुणे चे दरम्यान पीएमटी बस व रिक्षा मधुन प्रवास करीत असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे जवळील लेदर पर्सची चैन उघडुन पर्समध्ये कापडी पिशवीमध्ये असलेले ७ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकुण २,८५,०००/- रु किं माल व रोख रक्कम फि यांचे संमतीशीवाय व लबाडीच्या इराद्याने चोरी करुन चोरुन नेली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सहा पो फौज गौडदाब९५२७५२२०२० |

५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | भोसरी ७३६/२०२२, भा.द.वि.क. २७९,३०४(अ) ,मो.वा.का.क.१८४,११९/१७७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दिनांक ०३/०९/२०२२ रोजी २३/३० वा. चे सुमारास डायची कंपणीच्या गेटसमोर, जुना मुंबई पुणे हायवे, नाशिक फाटा, कासरवाडी, पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक ०७/०९/२०२२ रोजी १३/१८ वाजता |
| फिर्यादी | :- | ताराचंद धर्मु राठोड, वय ५३ वर्षे, धंदा नोकरी, सध्या रा. प्लॉट नं. २७बी, कोमल नगर, पडेगाव, ता.जि. औरंगाबाद, मुळ रा. सितानाईक तांडा, कोळवाडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद |
| आरोपी | :- | जावेद आबेद शेख, वय ५० वर्षे, धंदा ड्रायव्हर (आयडी नं.२०६३९) रा. कानडे यांची बिल्डींग, दत्त मंदीराशेजारी, वाल्हेकरवाडी, चिंचवड पुणे |
| तपशिल | :- | वर नमुद ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीच्या भावाचा मुलगा नामे उमेश लालचंद राठोड, वय २२ वर्षे, धंदा शिक्षण, सध्या रा. आकुर्डी, पुणे मुळ रा.सितानाईक तांडा, कोळवाडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद हा तो काम करीत असलेल्या हॉटेल कलासागर, कासारवाडी पुणे येथुन त्याचे आकुर्डी येथील रूमवर जात असताना तो बीआरटी रोड क्रॉस करीत असताना पीएमपीएल ची बस क्रं. एम.एच.१४ एच.यु. ५९८४ वरील चालकाने त्याचे ताब्यातील बस वाहतूकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून हयगयीने, अविचाराने भरधाव वेगाने चालवून उमेश यास धडक मारून त्याचे डोक्याला गंभीर दुखापत करून त्याचे मरणास कारणीभूत झाला आहे. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | रविंद्र भवारी, पोलीस उपनिरीक्षक ९६२३८८२००८ |

६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | दिघी ३८५/२०२२ भादवी कलम ४१९ ४२० सह माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ सी डी |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २८/०८/२०२२ रोजी स ७/०० वा ते ७/४५ वा चे दरम्यान माझे रहाते घरी स नं ७३ शिवकृपा शिवनगरी दिघी पुणे |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा दाखल | :- | दि ०७/०९/२०२२ रोजी २२ / २० वा |
| फिर्यादी | :- | रामचंद्र दगडु जाधव वय ६१ वर्ष धंदा सेवानिवृत रा स नं ७३ शिवकृपा शिवनगरी दिघी पुणे |
| आरोपी | :- | ९२२३००८३३३ व ९३३९७३४५०८ यावरील अज्ञात इसम |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील ९२२३००८३३३ व ९३३९७३४५०८ मोबाईन नं धारक अज्ञात आरोपी याने फिर्यादीचे एसबीआय शाखा कासारवाडी पुणे येथील बँकेस रजीस्टर असलेला मो नं ९८९०९९०३२७ यावर फिर्यादीस फोन करुन बँकेचे अकाऊंट बंद होणार असुन पँनकार्ड अपडेट करा असा आशयाचा इंग्रजीमध्ये खोटा मेसेज करुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन फिर्यादीचे स्टेट बँक ऑफ इंडीया कासारवाडी येथील सेव्हींग अकाउंट नं ३०२८७५३९३३७ यावरुन ४९,९९९/- रु व सदर बँकेमधील एफडी अकाउंट नं ४१००४९३७४२५ यावरुन ३,७४ ९९९/- रु असा एकुण ४,२४,९९८ रु ची ऑनलाईन बँकींगदवारे फसवणुक केलेली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | श्री जितेंद्र कदम पोनिरी गुन्हे ९८२३३४८००७ |

७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | भोसरी ७३७/२०२२ भादवि कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०४/०९/२०२२ रोजी रात्रौ ०९/३० वा. पासुन ते दि. ०५/०९/२०२२ रोजी सकाळी ०७/३० वा. सुमारास एक्सल इंटरप्रायजेच, सर्वे नं. २४/२, आनंद नगर, इंडस्ट्रियल इस्टेट, भोसरी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०७/०९/२०२२ रोजी २२/३४ वा. |
| फिर्यादी | :- | सुरज हरीदास सोनवणे वय-२९ वर्षे, धंदा-व्यवसाय,रा. ट्रिप्लेक्स इल्क्ट्रो केम कंपनी, जे ब्लॉक, प्लॉट नं.३७१, एमआयडीसी भोसरी पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमुद ता वेळ व ठिकाणी यांतील फिर्यादी यांचे एक्सल इंटरप्रायजेच, सर्वे नं. २४/२, आनंद नगर, इंडस्ट्रियल इस्टेट, भोसरी पुणे या शॉपची खिडकी कोणीतरी अज्ञात चोरटयाने कशाच्यातरी साहयाने फोडुन त्याद्वारे आत प्रवेश करुन एकुण १६,४००/- रु किंमतीचे मेटलचे बुश व मेटलचे एनबीएन फ्लॅपर स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी लबाडीच्या इरादयाने फिर्यादीचे संमतीशिवाय चोरुन नेले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | स पो नि गायकवाड ९५५२५४६१३१ |

८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | वाकड ७५८/२०२२ भा.द.वि.कलम- ३७०(३), ३४ सह अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५,७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दिनांक-०६/०९/२०२२ रोजी सायं १९/२५ वा. सुमारास शॉप नंबर १७/५/१, साई सागर प्लाझा, औंध रावेत बीआरटी रोड, साई चौक, जगताप डेअरी, पिंपळे सौदागर, पुणे येथील Castle नावाचे स्पा सेंटरमध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक- ०७/०९/२०२२ रोजी ०२.५१ वा. |
| फिर्यादी | :- | विजय लक्ष्मण कांबळे वय ५६ वर्षे पोउपनि अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष पिंपरी चिंचवड |
| आरोपी | :- | १) रमेश कुमार साहीराम वय २४ वर्षे रा. सद्या. स्पामध्ये मुळ पत्ता- वार्ड नं- ५ गाव- ३ एमके जि.गंगानगर,राज्य- राजस्थान |

| | | |
|---|---|---|
| | | १)महिला आरोपी (स्पा मॅनेजर) **आरोपी अटक आहेत** |
| तपशिल | :- | वर नमुद केले ता. वेळी व ठिकाणी आरोपी क्रं १ व २ यांनी स्पा सेंटरचे नावाखाली ५ पिडीत महिला यांना पैशांचे अमिष दाखवून त्यांना स्पा मसाज सेंटरचे नावाखाली प्राप्त करून वेश्याव्यवसायासाठी प्रवृत्त करुन त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करवून घेऊन त्यातून मिळालेल्या रकमेतून स्वतःची उपजिवीका भागवित असताना मिळून आले तसेच वरिल आरोपी यांनी सार्वजनिक ठिकाण/धार्मीक स्थळ याचेपासुन २०० मिटरचे आत वेश्याव्यवसाय चालवत तसेच आरोपीच्या ताब्यातुन रोख रक्कम, मोबाईल व कंडोम पाकीट असा एकुण १३,१४०/- मुददेमाल आरोपींच्या ताब्यातुन मिळुन आले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सचिन चव्हाण पोउनि९५४५४८६०२८ |